**नियमित दिवाणी दावा क्र. १२०/२०१६ मधील निशाणी क्र. ५३ वरील आदेश**

( पांडु शेळके व इतर वि. अहिलाजी शेळके व इतर)

वादी यांनी सदरचा अर्ज प्रतिवादी क्रमांक ४ यांचे कायदेशिर प्रतिनिधी अभिलेखावर सामील करणेकरीता दाखल केला आहे.

**०२.** अर्ज व म्हणणे वाचले. दोन्ही वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

**०३.** प्रतिवादी क्रमांक ४ लहानु कोंडाजी राउत यांचा मुत्यु दिनांक १५.०७.२०२५ रोजी झाला आहे. कायदेशीर तरतुदींप्रमाणे सदर प्रतिवादी क्र. ४ चे कायदेशिर प्रतिनिधी दिनांक १५.१०.२०२५ रोजी किंवा त्यापूर्वी अभिलेखावर घेणे आवश्यक होते. परंतु, तसे न केल्यामुळे प्रतिवादी क्र. ४ चा दावा अवसायन पावला आहे. नि.४९ व ५१ वरील आदेशांप्रमाणे दावा अवसायन पावल्याचा आदेश रद्द होणेकरीता अर्ज दाखल करणेस झालेला विलंब माफ करण्यात आलेला आहे व दावा अवसायन पावल्याचा आदेश रद्द करण्यात आला आहे. प्रस्तुत दावा वादीने वाटपासाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्रमांक ४ यांचे पश्चात त्यांचे कायदेशिर प्रतिनिधींविरुध्द प्रस्तुत दावा चालविण्याचे अधिकार प्राप्त होतात. अर्जामधील नमूद इसम प्रतिवादी क्रमांक ४ यांचे कायदेशिर प्रतिनिधी नाही अशी कोणतीही हरकत प्रतिवादींनी नोंदविलेली नाही. त्यामूळे अर्जात नमूद कायदेशिर प्रतिनिधींना प्रतिवादी क्रमांक ४ चे कायदेशिर प्रतिनिधी म्हणुन दाव्यात सामील करणे नैसर्गिक न्यायाचे दृष्टिने आवश्यक आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करते.

**आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्रमांक ४ यांचे कायदेशिर प्रतिनिधींना अभिलेखावर सामील करण्यात यावे. अर्जदाराने तशी दुरुस्ती करुन दावा दुरुस्त प्रत दाखल करावी.

NANAWARE MOHINI DATTATRAY
Digitally signed by NANAWARE MOHINI DATTATRAY
Date: 2026.05.08 13:09:01 +0530

स्थळः— इगतपुरी
दिनांकः— ०८/०५/२०२६

( मो. द. ननवरे )
सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर,
इगतपुरी.